RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ७४

दि.१० जुलै २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## समान नागरी कायद्याच्या मसुद्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती गठीत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत केली.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारताच्या संविधानातील राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक राज्याने समान नागरी कायद्याचा विचार करावा, असे निर्देश आहेत. त्यानुसार २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी समिती स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत या समितीची स्थापना करण्यात येत आहे.

समितीमध्ये न्यायमूर्ती रंजना देसाई (माजी न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय), न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण (माजी न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), न्यायमूर्ती एस. जी. मेहरे (माजी न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), डी. के. जैन (माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य), अॅड. वीरेंद्र सराफ (माजी महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य), रमेश पतंगे (पद्मश्री व संविधान अभ्यासक) आणि सुवर्णा रावल (शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या) यांचा समावेश आहे.

ही समिती पुढील सहा महिन्यांत आपला अहवाल राज्य शासनाला सादर करेल. या अहवालाच्या आधारे येत्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायद्याचे विधेयक विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

### जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी सुरू; ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये इयत्ता पाचवीमध्ये शिकत असलेल्या आणि ज्यांचा जन्म १ मे २०१५ ते ३१ जुलै २०१७ या दरम्यान झाला आहे, अशा पात्र विद्यार्थ्यांसाठी जवाहर नवोदय विद्यालय इयत्ता सहावी प्रवेश परीक्षेची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. ही परीक्षा २८ नोव्हेंबर २०२६ रोजी घेतली जाणार आहे.

या परीक्षेसाठी ऑनलाईन पद्धतीने फॉर्म भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून इच्छुक व पात्र उमेदवारांनी http://navodaya.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपले अर्ज मुदतीत सादर करावेत, असे आवाहन लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्राचार्यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

### अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांतील प्रलंबित नियुक्ती प्रस्तावांना महिनाभरात मंजुरी – राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**मुंबई/प्रतिनिधी :** अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांमधील नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित नियुक्ती प्रस्तावांना एक महिन्याच्या आत मंजुरी देण्याचे निर्देश विभागाला देण्यात आले आहेत. तसेच शिक्षक वेतन विलंबाच्या प्रश्नावर शासन सकारात्मक आहे, अशी माहिती राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य जगन्नाथ अभ्यंकर यांनी अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांमधील नियुक्त शिक्षकांच्या वेतनास होणारा विलंब आणि प्रलंबित नियुक्ती प्रस्तावांचा प्रश्न उपस्थित केला होता.

राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, नियमानुसार ८० टक्के पदे भरण्यास परवानगी देण्यात आली असून, उर्वरित २० टक्के पदांसाठी वित्त विभागाची मंजुरी मिळताच ती पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. पोर्टलवरील अतिरिक्त शिक्षकांबाबत उपस्थित करण्यात आलेल्या समस्येचाही आढावा घेऊन त्यांना अतिरिक्त न ठरविण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल.

### सिंहस्थ कुंभमेळा रिंगरोडच्या अलाइनमेंट बदलाची उच्चस्तरीय चौकशी करणार– मंत्री बावनकुळे

**मुंबई/प्रतिनिधी :** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी प्रस्तावित बाह्य रिंगरोड प्रकल्पात कमीत कमी भूसंपादन करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू असून, मातोरी आणि मुंगसरे परिसरातील रिंगरोडच्या अलाइनमेंटमध्ये काही विशिष्ट व्यक्तींना लाभ मिळावा म्हणून बदल करण्यात आला आहे का, याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करून शेतकऱ्यांना न्याय दिला जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित रिंगरोडच्या अलाइनमेंटमध्ये बदल झाल्याबाबत सदस्य विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे बोलत होते. यावेळी सदस्य सरोज अहिरे यांनीही चर्चेत सहभाग घेतला.

मंत्री बावनकुळे म्हणाले की, हा रिंगरोड भविष्यातील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा पायाभूत सुविधा प्रकल्प असून, तो राबविताना शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन योग्य व समाधानकारक मोबदला देण्यावर शासनाचा भर राहील. शक्य तितके कमी भूसंपादन करून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. मोजणीच्या वेळी काही ठिकाणी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. शेतकऱ्यांच्या विरोधामुळे अधिकाऱ्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने हेल्मेट व अन्य संरक्षक साहित्याचा वापर केला होता. मात्र, प्रकल्पाबाबत कोणावरही अन्याय होणार नाही, याची शासन दक्षता घेईल. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, या प्रकरणाची अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्यात येणार आहे. रिंगरोडच्या अलाइनमेंटमध्ये तीन वेळा करण्यात आलेल्या बदलांची सखोल तपासणी केली जाईल. चौकशी अहवालानुसार दोषी अधिकारी किंवा संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येईल.

## शिक्षक आंदोलकांच्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने चर्चा करावी; माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांची विधानसभेत मागणी




**मुंबई/लातूर/प्रतिनिधी :** मुंबईतील आझाद मैदानावर आपल्या विविध न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या राज्यातील शिक्षकांच्या प्रश्नाकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन (औचित्याचा मुद्दा) द्वारे विधानसभा सभागृहात निवेदन सादर केले.

शिक्षकांचे मुंबईत तीव्र आंदोलन

महाराष्ट्र विधानसभा सभागृहात ९ जूलै रोजी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख म्हणाले की, महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेचे श्री. लायक पटेल, श्री. केशवराव जाधव, श्री. राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील असंख्य शिक्षक मुंबईतील आझाद मैदानावर पावसात आंदोलन करत आहेत. शिक्षकांच्या या आंदोलनाकडे शासनाने दुर्लक्ष करून चालणार नाही.

प्रमुख मागण्यांकडे शासनाचे लक्ष

शिक्षकांच्या मागण्यांबाबत माहिती देताना माजी मंत्री, आमदार देशमुख यांनी सांगितले की, मुख्यत्वे टीईटी () ची अट शिथिल करावी, शिक्षकांना अशैक्षणिक कामातून वगळावे आणि शाळांचे थकलेले अनुदान त्वरित मिळावे, यासह अन्य प्रलंबित मागण्यांसाठी हे शिक्षक लढा देत आहेत.

शासनाला सकारात्मक कार्यवाहीच्या सूचना

शिक्षकांचे हे प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाने आपला अधिकृत प्रतिनिधी आंदोलक संघटनेच्या शिष्टमंडळाला भेटण्यासाठी पाठवावा किंवा आंदोलक शिष्टमंडळाला संबंधित मंत्री महोदयांची भेट घेऊन चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, असे निवेदन यावेळी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी केले.

माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी उपस्थित केलेल्या या निवेदनाची दखल घेत विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांनी, या विषयावर शासनाने तातडीने नोंद घ्यावी आणि योग्य ती कार्यवाही करावी, अशा सूचना संबंधित विभागाला दिल्या आहेत.

---

## संतपीठाच्या विकासासाठी तातडीने १ कोटींचा निधी– मंत्री चंद्रकांतदादा पाटील


**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या संतपीठ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा एक विभाग म्हणून कार्यरत आहे. संतपीठाच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासन सकारात्मक असून, तातडीच्या गरजांसाठी १ कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच संस्थेने मागितलेल्या ३५ कोटी रुपयांच्या निधीबाबतही आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी विधान परिषदेत दिली.

सदस्य श्रीकांत भारतीय यांनी म.वि.प. नियम ९७ अन्वये या विषयी विधान परिषदेत अल्पकालीन चर्चा उपस्थितीत केली होती.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, सध्या संतपीठामध्ये २०२१ ते २०२५ या कालावधीत १,०७२ विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले असून, यंदापासून एक वर्षाचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रयत्न केला जात आहे. संतपीठासाठी काही बांधकामे पूर्ण करणे तसेच प्राध्यापक आणि अध्यापकांच्या मानधनासाठी तातडीने निधीची आवश्यकता असल्याने १ कोटी रुपयांचा निधी वितरित केला जाईल. उर्वरित बांधकामांच्या गरजांचा आढावा घेऊन आवश्यक निधीही उपलब्ध करून दिला जाईल.

राज्यात अलीकडेच मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली असून त्यालाही अधिक सक्षम करण्यात येत असल्याचे सांगत, दिव्यांगांसाठी स्वतंत्र विद्यापीठ तसेच आदिवासींसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत आलेल्या सूचनांचाही शासन स्तरावर एकत्रितपणे विचार सुरू असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले.

संतपीठाचे स्वतंत्र विद्यापीठात रूपांतर करण्याच्या प्रस्तावावरही शासन सकारात्मक असून, अशा विद्यापीठासाठी सुमारे ३०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे टप्प्याटप्प्याने विकासाची प्रक्रिया राबविण्यात येईल. वारकरी संप्रदायाच्या अभ्यासाला चालना देण्यासाठी तज्ज्ञ आणि संबंधित मान्यवरांना या प्रक्रियेत सहभागी करून संतपीठाचा सर्वांगीण विकास करण्यात येईल, असे मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी स्पष्ट केले.



साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने सहकारमहर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष पिराजी साठे, काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष प्रा. शिवाजी जवळेकर, माजी उपमहापौर कैलास कांबळे, नगरसेवक विकास कांबळे, अशोक देडे, आनंद वैरागे, जी. ए. गायकवाड, नारायण कांबळे, श्रीमंत गायकवाड, रवी कदम,विशाल काळे, श्रावण मस्के, काकासाहेब मगर आदी उपस्थित होते.

## 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना' ज्येष्ठ कलावंतांना सन्मानाने जगण्याचा आधार

### सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत १ ते ३१ जुलैदरम्यान ऑनलाइन अर्ज प्रक्रिया; पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५ हजार रुपये मानधन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना' अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५,००० रुपये मानधन प्रदान करण्यात येणार आहे. या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी दि. १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत करण्यात आले आहे.



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक विकासाची दिलेली प्रेरणा जपत, आयुष्यभर कला आणि साहित्य क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना आर्थिक आधार व सन्मान मिळावा, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांच्या योगदानाचा गौरव करून त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगण्यास सहाय्य करणे, हा या योजनेमागील प्रमुख हेतू आहे.

या योजनेसाठी अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असणे आवश्यक असून दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादेत १० वर्षांची शिथिलता देण्यात आली आहे. त्यामुळे दिव्यांग अर्जदारांसाठी किमान वय ४० वर्षे निश्चित करण्यात आले आहे. अर्जदाराचे कला अथवा साहित्य क्षेत्रातील किमान १५ वर्षांचे योगदान आवश्यक असून वयाने ज्येष्ठ असलेले विधवा, परित्यक्ता आणि दिव्यांग कलाकारांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा अधिक नसावे. तसेच ज्यांची उपजीविका प्रामुख्याने कलेवर अवलंबून असून अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही, अशाच पात्र कलाकारांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. केंद्र किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही नियमित मासिक पेन्शन अथवा महामंडळाच्या निवृत्तीवेतनाचा लाभ घेणारे अर्जदार या योजनेसाठी अपात्र राहतील. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे.

ऑनलाइन अर्ज भरताना वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पती-पत्नीचे संयुक्त छायाचित्र (लागू असल्यास), बँक पासबुक, अपंगत्व प्रमाणपत्र (लागू असल्यास), राज्य अथवा केंद्र शासनाचे संबंधित प्रमाणपत्र (लागू असल्यास), नामांकित संस्था किंवा व्यक्तींचे शिफारसपत्र (लागू असल्यास) तसेच आवश्यक इतर कागदपत्रे सादर

करणे बंधनकारक आहे. सदर योजना मा. अॅड. आशिष शेलार, मंत्री (सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास), महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून तसेच मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. राज्यातील ज्येष्ठ साहित्यिक आणि कलाकारांच्या कलासाधनेचा सन्मान करून त्यांना सामाजिक व आर्थिक बळ देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सातत्याने विविध कल्याणकारी उपक्रम राबवत आहे. पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी अर्जाची अंतिम मुदत लक्षात घेऊन दि. ३१ जुलै २०२६ पूर्वी 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

## संपादकीय...

### परिपक्वतेचा अभाव अन् ब्रेकअपचे फंड

डेटिंग डॉटकॉम या जागतिक डेटिंग प्लॅटफॉर्मची 'चीफ ब्रेकअप ऑफिसर' (सीबीओ) या पदासाठीची जाहिरात चांगलीच चर्चेत आली. संवाद कौशल्य, इमोशनल इंटेलिजन्स, आधुनिक डेटिंग संस्कृतीची माहिती असणाऱ्याला या पदासाठी दरमहा ३००० अमेरिकन डॉलर (सुमारे २.८ लाख रुपये) इतका पगार ऑफर केला आहे. प्रेमसंबंध सन्मानपूर्वक संपवणे हे त्याचे काम असून ज्यांनी नाते संपवण्याचा निर्णय घेतला आहे, अशा लोकांच्या जोडीदारांशी तो संवाद साधेल. ब्रेकअप करताना भावना दुखावल्या जाणार नाहीत आणि संवाद आदरपूर्वक होईल, अशी कंपनीची अपेक्षा आहे. ही संकल्पना प्रथमदर्शनी विनोदी किंवा केवळ प्रसिद्धीसाठी केलेली मार्केटिंग युक्ती वाटू शकते; मात्र थोडे गांभीर्याने पाहिल्यास ती आजच्या बदलत्या नातेसंबंधांची एक महत्त्वाची नोंद ठरते. नाते जोडण्याइतकेच ते सन्मानपूर्वक संपवण्याची गरज वाढली आहे. त्यामुळेच 'ब्रेकअप ऑफिसर' हा केवळ रोजगाराचा एक वेगळा प्रयोग नाही, तर बदलते सामाजिक वास्तव, नातेसंबंधांचे बदलते स्वरूप आणि संवाद कौशल्यातील घटता आत्मविश्र्वास याचे हे प्रतीक आहे. आजघडीला नाते जोडणे सोपे झाले आहे. सोशल मीडिया, डेटिंग प्स आणि डिजिटल माध्यमांमुळे काही क्षणांत ओळखी होतात, मैत्री होते आणि प्रेमसंबंधही जुळतात; परंतु ही नाती तुटू शकतात, हे सुरुवातीला लक्षात येत नाही. त्यातून वाईट पद्धतीने ब्रेकअप होतात. त्यामुळेच नाते सन्मानपूर्वक संपवणेदेखील महत्त्वाचे आहे. इथेच आधुनिक युवांची सर्वात मोठी अडचण दिसते. अनेकांना नाते टिकवणे अवघड वाटतेच; पण नाते संपवण्याची जबाबदारी स्वीकारणेही कठीण वाटते. त्यातून 'घोस्टिंग' म्हणजे कोणतेही स्पष्टीकरण न देता अचानक संपर्क तोडणे यासारख्या प्रवृत्ती वाढतात. यावर उपाय म्हणून ब्रेकअपचा संवाद प्रोफेशनल व्यक्तीकडून घडवून आणण्याची ही संकल्पना आहे. कंपनीचा यामागील हेतू समोरच्या व्यक्तीला 'क्लोजर' मिळावा, हादेखील आहे. ब्रेकअप ही केवळ माहिती देण्याची प्रक्रिया नाही. त्यामध्ये निर्णयाची जबाबदारी स्वीकारणे आणि समोरच्या व्यक्तीच्या भावनांचा आदर करणे अपेक्षित असते. यात प्रोफेशनल सेवेचा पर्याय स्वीकारला, तर नातेसंबंध अधिक व्यवहारप्रधान होतील. तथापि, या सेवेमागील काही सकारात्मक बाजू दुर्लक्षित करता येणार नाहीत. प्रत्येक नाते समान परिस्थितीत संपत नाही. मानसिक छळ किंवा सुरक्षिततेचा प्रश्र्न असेल, तर प्रशिक्षित व्यक्तीमार्फत संवाद उपयुक्त ठरू शकतो. बदलती पिढी आणि तिची संवाद पद्धतीही या बदलांमागे आहे. डिजिटल माध्यमांवर सतत सक्रिय असलेल्या पिढीला समोरासमोरचा कठीण संवाद टाळावा वाटू शकत असेल. ही भीती ब्रेकअपपुरती मर्यादित नाही. मतभेद, माफी, नकार किंवा संघर्ष यांचा सामना करण्याची तयारी कमी होत चालली आहे का, असे वाटते. एआय प्रेमपत्र लिहून देईल, अल्गोरिदम भेटवस्तू निवडेल, वाद मिटवण्यासाठी चॅटबॉट सल्ला देईल आणि अधिकारी ब्रेकअप करून देणार असेल, तर मानवी नात्यांतील प्रत्यक्ष संवादाचे स्थान नेमके काय असेल? 'चीफ ब्रेकअप ऑफिसर' हा चर्चेचा आणि बदलत्या काळाच्या गरजांचे प्रतिबिंब दाखवणारा विषय आहे. त्याचा स्वीकार करताना मूळ प्रश्र्न विसरून चालणार नाही. समस्या ब्रेकअपची नाही, संवादाची आहे. नाते तुटणे ही नैसर्गिक घटना असू शकते; पण ते सन्मानाने, प्रामाणिकपणे आणि जबाबदारी स्वीकारून घडणे, हीच परिपक्वता आहे.

# भूकंपादरम्यान घ्यावयाच्या खबरदारीविषयी जनजागृती करावी -जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

## – हिंगोली जिल्ह्यातील भूकंपाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणांचा आढावा
## – नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** भूकंपासारख्या आपत्कालीन परिस्थितीत काय काळजी घ्यावी, काय करावे याविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करावी. तसेच सर्व शासकीय विभागांनी सतर्क राहून कोणत्याही प्रकारच्या अफवा पसरणार नाहीत, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज येथे दिल्या. हिंगोली जिल्ह्यात झालेल्या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित शासकीय यंत्रणांचा आढावा घेतला.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक टेकाळे, ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार यावेळी उपस्थित होते. तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीला उपस्थित होते.

हिंगोली जिल्ह्यात आज पहाटे भूकंपाचे चार धक्के बसल्याची माहिती प्राप्त झाली आहे. लातूर जिल्ह्यातही काही भागात हे धक्के जाणवले. अशा परिस्थितीत नागरिकांनी काय खबरदारी घ्यावी, याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. तसेच या अनुषंगाने कोणत्याही अफवा पसरणार नाहीत, याची दक्षता सर्व यंत्रणांनी घ्यावी. भूकंप अथवा इतर कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांना तत्काळ योग्य मार्गदर्शन आणि माहिती देण्याची दक्षता घ्यावी. तसेच अशा परिस्थितीत सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहून समन्वयाने काम करावे, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले.

लातूर जिल्ह्यातील पाऊस व खरीप पेरण्यांची सद्यस्थिती, पाणी टंचाई उपाययोजना आदी बाबींचाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी आढावा घेतला आणि अनुषंगिक सूचना दिल्या. प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी माहिती दिली.

लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत भूकंप सुरक्षा व आपत्कालीन मार्गदर्शक सूचना जारी

भूकंपाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घाबरून न जाता संयम ठेवावा आणि सुरक्षेच्या दृष्टीने खालील सूचनांचे तंतोतंत पालन करण्याचे आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत करण्यात आले आहे.

**१. भूकंपाचा धक्का जाणवत असताना (काय करावे?)**

घराच्या आत असल्यास: मजबूत टेबल, खाट किंवा बीम/कॉलमच्या खाली आसरा घ्या आणि टेबलचे पाय घट्ट पकडून ठेवा.

दरवाजाच्या चौकटीखाली किंवा कोपऱ्यात उभे राहा.

घराबाहेर असल्यास: तात्काळ मोकळ्या जागेत जा. उंच इमारती, विजेचे खांब, झाडे आणि जुन्या भिंतींपासून लांब राहा.

गाडी चालवत असल्यास: वाहन सुरक्षित व मोकळ्या जागेत रस्त्याच्या बाजूला थांबवा. पूल, ओव्हरब्रिज, विजेच्या तारा किंवा उंचावरून पडणाऱ्या वस्तूंच्या खाली वाहन थांबवू नका.

शांत राहा: स्वतः शांत राहा आणि इतरांनाही धीर द्या.

**२. भूकंपादरम्यान (काय करू नये? )**

लिफ्टचा वापर करू नका: बाहेर पडण्यासाठी फक्त पायऱ्यांचा वापर करा.

काच व जड वस्तूंपासून दूर राहा: खिडक्या, काचा, अस्ताव्यस्त टांगलेले फोटो फ्रेम्स आणि उंच कपाटांपासून लांब राहा.

धावपळ/चेंगराचेंगरी करू नका: इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारावर किंवा पायऱ्यांवर एकाच वेळी गर्दी करू नका.

**३. भूकंपानंतर (काय करावे व काय करू नये?)**

**काय करावे?**

आपत्कालीन सूचना ऐका: रेडिओ, टीव्ही किंवा जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत सोशल मीडिया चॅनेल्सवरून मिळणाऱ्या सूचनांचेच पालन करा.

संभाव्य आफ्टरशॉक्स : मुख्य धक्क्यानंतर लहान-मोठे धक्के बसू



शकतात, त्यामुळे सतर्क राहा आणि मोकळ्या जागेत राहा.

कनेक्शन बंद करा: घरातील पाणी, वीज आणि गॅस सिलिंडरचे कनेक्शन तातडीने बंद करा.

रस्ते मोकळे ठेवा: रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि बचाव पथकांच्या वाहनांना ये-जा करण्यासाठी रस्ते मोकळे ठेवा.

जखमींची पाहणी: कुटुंबातील व आसपासच्या लोकांची पाहणी करा आणि प्रथमोपचार द्या.

**काय करू नये?**

आग लावू नका: काडी ओढू नका, मेणबत्ती लावू नका किंवा विजेची स्विचेस चालू/बंद करू नका (गॅस गळतीमुळे आगीचा धोका असतो).

विजेच्या तारांना हात लावू नका: उघड्या किंवा तुटलेल्या विजेच्या तारांना स्पर्श करू नका.

दूषित पाणी पिऊ नका: रोगराई पसरू नये म्हणून फक्त उकळलेले किंवा स्वच्छ उपलब्ध पाणीच प्या.

क्षतिग्रस्त इमारतींमध्ये जाऊ नका: तडे गेलेल्या किंवा नुकसान झालेल्या इमारतींमध्ये पुन्हा राहण्यासाठी जाऊ नका.

अफवा पसरवू नका: अनधिकृत संदेशांवर विश्वास ठेवू नका आणि अफवा पसरवू नका.

**४. आपत्कालीन किट**

प्रत्येक कुटुंबाकडे खालील वस्तूंचे आपत्कालीन किट तयार असावे:

१. पिण्याचे पाणी व कोरडा सुकामेवा/अन्न २. टॉर्च, अतिरिक्त बॅटऱ्या व रेडिओ

३. प्रथमोपचार पेटी व आवश्यक औषधे

४. महत्त्वाच्या कागदपत्रांच्या छायाप्रती

**आपत्कालीन हेल्पलाईन क्रमांक :**

१०१ (अग्निशमन) । १०० / ११२ (पोलीस) । १०८ (वैद्यकीय आपत्कालीन सेवा)

# १४० आणि १६०० नंबर सीरीजवरील कॉल्सवर स्पॅम लेबल दाखवणे बंद: ट्राईचे ट्रूकलरला निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :** दूरसंचार नियामक प्राधिकरण (ऊींअघ) नं ट्रूकलरसारख्या कॉलर आयडेंटिफिकेशन ॲप्सना १४० आणि १६०० नंबर सीरीजमधील कॉल्सवर स्पॅम लेबल दाखवणे बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. ही संख्या सरकारी आणि अधिकृत व्यावसायिक सेवांसाठी वापरली जाते. यामुळं खऱ्या कॉल्सना अडथळा येत होता, असं ट्राईचं म्हणणं आहे. ट्राईनं २०२५ मध्ये दूरसंचार व्यावसायिक संप्रेषण ग्राहक प्राधान्य नियमांत सुधारणा केल्या होत्या. यानुसार, थर्ड-पार्टी ॲप्सनी १४० आणि १६०० सीरीजमधील कॉल्स ब्लॉक किंवा टॅग करू नयेत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

ट्राई का घेतला हा निर्णय? : १४० सीरीज मुख्यत: टेलिमार्केटिंगसाठी आणि १६०० सीरीज बँकिंग व वित्तीय सेवांसाठी (पेमेंट अलर्ट, खाते अपडेट्स इ.) राखीव आहे. ही संख्या अधिकृत बिझनेस लाइन्स म्हणून ओळखली जाते. मात्र, वापरकर्त्यांच्या क्राउड-सोर्स्ड स्पॅम रिपोर्टमुळं ॲप्स संपूर्ण श्रेणीला स्पॅम म्हणून दाखवत होतं. यामुळं नोंदणीकृत व्यवसाय आणि सरकारी संदेश देखील प्रभावित होत होते. ट्राईनं यावर आळा घालण्यासाठी हे पाऊल उचललं आहे.

ट्रूकलरनं ट्राईच्या निर्देशांचं पालन केल्याचं सांगितलं आहे. मात्र, कंपनीनं यामुळं निर्माण झालेल्या समस्यांकडं लक्ष वेधलं आहे. ट्रूकलरचे सीईओ रिशित झुनझुनवाला यांनी सांगितलं की, दररोज ५१ मिलियनहून अधिक १४० आणि १६०० सीरीजचे कॉल्स उत्तर न मिळाल्यानं डिस्कनेक्ट होत आहेत. टेकक्रंचच्या रिपोर्टनुसार, गेल्या आठ महिन्यांत १४० सीरीजच्या ८१ टक्के आणि १६०० सीरीजच्या ७९ टक्के कॉल्स वापरकर्त्यांनी दुर्लक्षित केले आहेत. याच काळात वापरकर्त्यांनी ७४ मिलियन कॉल्स मॅन्युअली ब्लॉक केले. ऑक्टोबर २०२५ नंतर १६०० सीरीजवरील ब्लॉकिंगचे प्रमाण तीनपट वाढलं आहे. ट्रूकलर आता या नंबरांना थेट स्पॅम म्हणून मार्क करण्यास असमर्थ असल्यानं ''ड्डीलिंहूत्ब ँत्दम्ज्ञा्'' बॅज दाखवत आहे. यामुळं वापरकर्त्यांना इशारा मिळतो की, ही संख्या अनेकांनी ब्लॉक केली आहे. ट्राईला आयटी ॲक्टअंतर्गत अधिकार हवे : सध्या ट्राईला ट्रूकलर, हिया, हूझकॉलसारख्या ॲप्सवर थेट कारवाई करता येत नाही, कारण ते आयटी ॲक्टअंतर्गत इंटरमीडियरी मानले जातात. ट्राई आता स्वत:ला अधिकृत एजन्सी म्हणून नियुक्त करण्याची मागणी करत आहे. यामुळं थेट कारवाई करता येईल.

फेब्रुवारी २०२५ मध्ये अंतिम रूप दिलेल्या नियमांनुसार, ही विशेष प्रीफिक्स संख्या वापरकर्त्यांना कॉलचा प्रकार त्वरित ओळखण्यास मदत करतात. बँका, एनबीएफसी, म्युच्युअल फंड्स आणि इन्शुरन्स कंपन्यांना २०२६ च्या सुरुवातीपर्यंत या नंबरांवर स्थलांतरित व्हावे लागणार आहे. ही बातमी वापरकर्त्यांच्या हितासाठी ट्राईनं उचललेल्या पावलावर प्रकाश टाकते, तर दुसरीकडं ट्रूकलरसारख्या ॲप्ससमोर येणाऱ्या व्यावहारिक अडचणींनाही हाताळते. यामुळं व्यावसायिक संदेश आणि ग्राहक संरक्षण यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न दिसतो.

## डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुलासाठी निधी उपलब्ध करून देणार- राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**मुंबई/प्रतिनिधी :** डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुलाच्या उभारणीसाठी शिक्षण विभागाकडून प्रस्ताव मागविण्यात आला असून, त्यामध्ये कार्यालय, ग्रंथालय आणि निवासस्थानाचा समावेश असलेला सुधारित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवून आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून दिला जाईल, अशी माहिती राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधानसभेत दिली.

डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुलासंदर्भातील लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते. ही लक्षवेधी सदस्य सुलभा खोडके यांनी मांडली होती. यावेळी डॉ. अतुलबाबा भोसले यांनी चर्चेत सहभाग घेतला.

राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, संकुलाच्या उभारणीसाठीचा प्रस्ताव अधिक व्यापक स्वरूपात तयार करण्यात येत असून, त्यामध्ये कार्यालय, ग्रंथालय आणि निवासस्थान यांचा समावेश करण्यात आला आहे.

# राज्य शासनाची कर्जमुक्ती : शाश्वत कृषी विकासाचे धोरण

शेती ही महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून राज्यातील लाखो कुटुंबांच्या उपजीविकेचा मुख्य आधार आहे. मात्र, हवामानातील अनिश्चितता, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, वाढता उत्पादन खर्च, बाजारपेठेतील चढ-उतार आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतात. अशा परिस्थितीत केवळ तात्पुरता दिलासा देणे पुरेसे नसून शेतकरी पुन्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, उत्पादनक्षम बनेल आणि भविष्यात कर्जाच्या दुष्टचक्रात अडकणार नाही, अशी दीर्घकालीन व्यवस्था उभी करणे आवश्यक ठरते.

याच व्यापक दृष्टिकोनातून राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी आणि सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक धोरणाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिली जात आहे.

कर्जमुक्तीचा मूलभूत उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणे हा असला, तरी त्यामागील व्यापक विचार अधिक महत्त्वाचा आहे. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा पतपुरवठ्यास पात्र होतो. नव्याने पीककर्ज उपलब्ध झाल्यामुळे तो वेळेवर बियाणे, खते, औषधे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करू शकतो. यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते आणि शेती अधिक सक्षम बनते.

या योजनेतील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध प्रकारच्या शेतकऱ्यांचा विचार करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपर्यंतची थकीत कर्जे असलेल्या पात्र शेतकऱ्यांना थेट कर्जमुक्ती दिली जात आहे. त्याचबरोबर दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता योजना उपलब्ध करून देण्यात आली आहे. अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर अशा शेतकऱ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे मोठ्या कर्जबाजारी शेतकऱ्यांनाही आर्थिक पुनरुज्जीवनाची संधी उपलब्ध झाली आहे.

शासनाने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विशेष विचार केला आहे. त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे आर्थिक शिस्त, वेळेवर कर्जफेड आणि बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होईल. ही बाब शाश्वत वित्तीय व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

योजनेची संपूर्ण अंमलबजावणी डिजिटल माध्यमातून केली जात आहे. महाआयटीच्या प्रणालीद्वारे आधार प्रमाणीकरण, ऑनलाइन पडताळणी, बँकांची संगणकीय माहिती आणि थेट लाभ वितरणामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि विश्वासार्ह झाली आहे. लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत, बँका, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. मोबाईल संदेशाद्वारे लाभार्थ्यांना माहिती देण्याची तसेच तक्रार निवारणाची स्वतंत्र यंत्रणाही उभारण्यात आली आहे. यामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि




लोकांचा विश्वास अधिक बळकट होईल.

शाश्वत कृषी विकासाचा विचार केवळ कर्जमुक्तीपर्यंत मर्यादित राहत नाही. राज्य शासनाचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना बारमाही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे, शेतीमालावर आधारित उद्योग-व्यवसायांना चालना देणे, कृषी प्रक्रिया उद्योगांचा विस्तार करणे, शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळवून देणे, तातडीच्या पणन व्यवस्था विकसित करणे, वेळेवर पतपुरवठा सुनिश्चित करणे आणि ग्रामीण भागात आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे आहे. या सर्व बाबी परस्परपूरक असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास आणि शेती अधिक लाभदायक होण्यास मदत होईल.

सिंचनाचा विस्तार झाल्यास पावसावरील अवलंबित्व कमी होईल. आधुनिक तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण आणि पीक नियोजन यामुळे उत्पादनात वाढ होईल. प्रक्रिया उद्योग उभारल्यास शेतीमालाला मूल्यवर्धन मिळेल आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. सक्षम पणन व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळण्यास मदत होईल. या सर्व घटकांची सांगड कर्जमुक्तीशी घालण्यात आल्याने ही योजना शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक आराखड्याचा भाग ठरते.

आजच्या काळात हवामान बदल हे शेतीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम, तांत्रिकदृष्ट्या आधुनिक आणि बाजारपेठेशी जोडलेला शेतकरी निर्माण करणे ही काळाची गरज आहे. कर्जमुक्तीमुळे निर्माण होणारे आर्थिक स्थैर्य, वेळेवर मिळणारा पतपुरवठा, आधुनिक शेती पद्धतींचा स्वीकार आणि मजबूत कृषी पायाभूत सुविधा या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे अधिक शाश्वत, सक्षम आणि स्पर्धात्मक कृषी व्यवस्था होय.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ही त्यामुळे केवळ कर्जमाफीची योजना नाही. ती शेतकऱ्याला नव्याने उभारी देणारी, आर्थिक विश्वास पुनर्स्थापित करणारी, डिजिटल सुशासनाला चालना देणारी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन शाश्वत विकासाला दिशा देणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. आर्थिक दिलासा, पतपुरवठा, सिंचन, आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ आणि पायाभूत सुविधांचा समन्वय साधून शेतकऱ्यांचे जीवन अधिक सुखी, समृद्ध आणि आत्मनिर्भर करण्याच्या राज्य शासनाच्या व्यापक धोरणातील हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

**-प्रवीण टाके**
**उपसंचालक,**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर**

# लव्हुरी गावात शिक्षणासाठी आंदोलन पेटले..!

## श्री.बडेबाबा विद्यामंदिराला ग्रामस्थ,पालकांनी टाळे ठोकले..!

**केज/प्रतिनिधी** : केज तालुक्यातील लव्हुरी गावात शिक्षणासाठी आंदोलन पेटले श्री.बडेबाबा विद्यामंदिराला ग्रामस्थ, पालकांनी टाळे ठोकले. शिक्षकांची रिक्त पदे न भरल्याच्या निषेधार्थ गुरुवार दिनांक ०९ जुलै २०२६ रोजी ग्रामस्थ,विद्यार्थी व पालकांनी श्री.बडेबाबा विद्यामंदिर या शाळेला टाळे ठोकून शाळा बंद ठेवून आंदोलन करण्यात आले.

प्रशासनाच्या आणि शाळा व्यवस्थापनाच्या गलथान कारभारामुळे संतप्त झालेल्या पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांना अखेर टोकाचे पाऊल उचलावे लागले. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील लव्हुरी येथील श्री.बडेबाबा विद्यामंदिर या शाळेमध्ये गेल्या अनेक




दिवसांपासून शिक्षकांची पदे रिक्त झाली आहेत. रिक्त झालेली सर्व शिक्षकांची पदे तातडीने भरण्यात यावीत यासाठी ग्रामस्थांनी प्रशासन, संस्था आणि शाळेकडे वेळोवेळी लेखी निवेदने देऊन आंदोलने करून पाठपुरावा करण्यात आला होता.

परंतु यावर प्रशासनाने कोणतीही दखल न घेतल्याने, ग्रामस्थांनी दिनांक ३ जुलै २०२६ रोजी दिलेल्या निवेदनात ग्रामस्थ व पालकांनी शाळेला इशारा दिला होता. की, जर दिनांक ९ जुलै २०२६ पर्यंत शाळेत नवीन शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली नाही, तर शाळेला कुलूप ठोकण्यात येईल.

परंतु शाळा व प्रशासनाला दिलेल्या मुदतीत शिक्षक भरती न केल्यामुळे आणि विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीकडे प्रशासन व सदरील संस्था ही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने गुरुवार रोजी सकाळीच ग्रामस्थ, विद्यार्थी आणि पालकांनी एकत्र येत शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराला टाळे ठोकून शाळा बंद करून जोपर्यंत शिक्षकांची रिक्त झालेली पदे भरली जात नाहीत, तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा पवित्रा आंदोलकांनी घेतला आहे. आंदोलन करतेवेळी पालक व ग्रामस्थ यांनी त्या अनुषंगाने शाळेचे मुख्याध्यापक यांना रीतसर निवेदन देऊन शाळा बंद आंदोलन करण्यात आले. या निवेदनावर ग्रामस्थ व पालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

ग्रामस्थांची मागणी:

आमच्या मुलांच्या शैक्षणिक भविष्याशी खेळ खेळला जात आहे. शिक्षक नसतील तर मुलांनी शिकायचे कसे? आम्ही वारंवार लेखी व तोंडी विनंती करूनही प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. आमची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत. संबंधित शाळा व प्रशासन आमच्या मागणीची कसल्याच प्रकारची दखल घेत नसल्यामुळे आम्हाला हे पाऊल उचलावे लागले आहे. तात्काळ शिक्षक न मिळाल्यास आंदोलन आणखी तीव्र करू.

संतप्त ग्रामस्थ व पालक, लव्हूरी आता या कुलूप बंद आंदोलनानंतर शिक्षण विभाग आणि शाळा संस्था प्रशासन काय पावले उचलते आणि विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी कधीपर्यंत शिक्षकांची नियुक्ती केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पुण्यात मावळमध्ये दरड कोसळून घर गाडले; ९ जणांची सुटका , युद्धपातळीवर बचावकार्य सुरु

**पुणे/प्रतिनिधी** : पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात मुसळधार पावसामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. विसापूर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पाटण गावात पहाटे दरड कोसळून एका कुटुंबाचे घर मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास दरड कोसळल्यानंतर घरातील सदस्य अडकल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, महसूल प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, लष्कर, अग्निशमन दल आणि स्थानिक प्रशासनाने संयुक्तपणे बचाव मोहीम सुरू केली. बचाव पथकांनी आतापर्यंत ९ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश मिळवले आहे. मात्र, आणखी ८ ते ९ जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून त्यांचा शोध सुरू आहे. जेसीबी आणि अत्याधुनिक बचाव उपकरणांच्या मदतीने मातीचा ढिगारा हटविण्याचे काम सुरू आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, पहाटे अचानक मोठा आवाज झाला आणि काही क्षणांतच संपूर्ण घर मातीखाली गाडले गेले. सततच्या मुसळधार पावसामुळे परिसरातील डोंगरभाग अस्थिर झाल्याने ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना डोंगरपायथ्याच्या आणि दरडप्रवण भागात सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे.

### सरसकट कर्जमुक्तीसाठी रविकांत तुपकर आक्रमक! शेतकऱ्यांसह विधानभवनात घुसण्याचा प्रयत्न

**बुलढाणा/प्रतिनिधी** : राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला नसल्याचा आरोप करत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी आज विधानभवनासमोर आक्रमक आंदोलन छेडले. यामुळे मुंबईस्थित विधानभवन परिसरात एकच खळबळ उडाली. बंदोबस्तसाठी तैनात पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाली. यावेळी शेतकरी नेते रविकांत तुपकरासह क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. ९ जुलै रोजी सकाळी करण्यात आलेल्या या आंदोलनाने शासन, प्रशासन हादरल्याचे दिसून आले. राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना विना अट सरसकट कर्जमुक्ती, पीकविमा, शेतमालाला हमीभाव आणि प्रलंबित शेतकरी प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा, या मागण्यांसाठी तुपकर शेतकऱ्यांसह थेट विधानभवनाच्या दिशेने धडकले. आज गुरुवारी सकाळी त्यांनी विधानभवनात घुसण्याचा प्रयत्न करीत सातबाऱ्यांच्या प्रती विधानभवनात फ ेकल्या. तसेच सोयाबीन आणि कापूस उधळून सरकारचा निषेध करण्यात आल्याने विधानभवन परिसरात एकच खळबळ उडाली .

### १५ वर्षांच्या मुलाच्या डोक्यात हत्येचा कट शिजत होता; मित्राला सोबत नेऊन संपवला खेळ, मुंबई हादरली

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई शहरातील चेंबूर पूर्व भागातून एक अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आलेली आहे. जिथं दोन अल्पवयीन मुलांमधील जुन्या वादाचे रुपांतर हे एका मुलाच्या मृत्यूमध्ये झालेले आहे. अवघ्या १५ वर्षांच्या मुलाने अत्यंत हुशारीने कट रचून आपल्याच अल्पवयीन असलेल्या मित्राचा काटा काढला आहे, ज्यामध्ये त्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या संपूर्ण घटनेची माहिती मिळताच गोवंडी पोलिसांनी तातडीने पावले उचलत हत्येचा गुन्हा दाखल करत अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मृत्यू झालेल्या मुलाचे नाव हाफिज शेख असे आहे. हाफिज आणि आरोपी मुलगा हे दोघे एकमेकांचे मित्र होते आणि घटनेदिवशी दोघही चेंबूर परिसरातील एका विहिरीजवळ खेकडे पकडण्यासाठी गेलेले होते.

# लातूर शहरातील अनधिकृत वसतिगृहांवर कारवाईची मागणी; अग्निसुरक्षा प्रमाणपत्र नसल्यास व्यवसाय तात्काळ बंद करा

## सामाजिक कार्यकर्ते पंकज देशमुख यांचा महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे गंभीर आरोप

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहरातील अनेक वसतिगृहांमध्ये अग्निसुरक्षेच्या नियमांचे पालन होत नसल्याचा आरोप करत, अग्निशामक विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र व अग्निसुरक्षा प्रमाणपत्र नसलेल्या वसतिगृहांवर तात्काळ कारवाई करून त्यांचा व्यवसाय बंद करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते पंकज रावसाहेब देशमुख यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे केली आहे.

याबाबत त्यांनी दिलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे की,लातूर शहरातील लातूर शहरातील सर्व वसतिगृहे ज्या कारणासाठी इमारती बांधण्यात आल्या आहेत त्या वापराऐवजी व्यावसायिक पद्धतीने चालविली जात आहेत. विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींना डावलून निवासी इमारतींचा वापर वसतिगृह, मेस व अन्य व्यावसायिक कारणांसाठी केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

वसतिगृहांना बांधकाम परवानगी कोणत्या वापरासाठी देण्यात आली आहे, त्या इमारती निवासी आहेत की व्यावसायिक, त्यांच्याकडे व्यवसाय परवाना आहे का, अग्निशामक विभागाची आवश्यक प्रमाणपत्रे आहेत का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीत पुढे म्हटले आहे की, काही वसतिगृहांमधून मेसचे ड्रेनेजचे सांडपाणी व घाण नाल्यांमध्ये सोडले जात असून परिसरात दुर्गंधी पसरत आहे. तसेच पार्किंगची सुविधा नसताना पार्किंगच्या जागेवर अभ्यासिका, मेस व इतर वापर सुरू असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

रहिवासी भागातील वसतिगृहांमुळे स्थानिक नागरिकांचे जीवन त्रस्त झाले असून, रात्रंदिवस विद्यार्थ्यांचा गोंधळ, वाहनांचे कर्कश हॉर्न आणि अन्य त्रासामुळे ज्येष्ठ नागरिकांसह नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

**दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्याऐवजी अगोदरच खबरदारी घ्या**

वसतिगृह मालकांकडून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत असल्याचा



आरोप करत पंकज देशमुख यांनी सांगितले की, एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासन जागे होण्यापेक्षा आधीच तपासणी करून नियमबाह्य वसतिगृहांवर कारवाई करणे गरजेचे आहे. लखनौ येथील वसतिगृहातील आगीच्या घटनेचा संदर्भ देत त्यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असल्याचे म्हटले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून तक्रारी करूनही महानगरपालिकेकडून अपेक्षित कारवाई झालेली नाही, असा आरोपही त्यांनी केला आहे. चारही क्षेत्रीय कार्यालयांनी मागील काळात कोणती कारवाई केली याचे स्पष्टीकरण देण्याची मागणी त्यांनी केली.

महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, क्षेत्रीय अधिकारी व संबंधित अभियंत्यांनी आठ दिवसांच्या आत या प्रकरणाची चौकशी करून अनधिकृत वसतिगृहांवर कारवाई करून सर्व वस्तीग्रह बंद करण्यात यावे अन्यथा मुख्यमंत्री व नगरविकास मंत्र्यांकडे संबंधित अधिकाऱ्यांविरोधात निलंबनाची नव्हे तर सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे कारण हा विषय विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडित आहे, असा इशारा पंकज देशमुख यांनी दिला आहे.

# मराठवाड्यातील पडीक जमिनींवर वृक्ष लागवडीतून वनीकरण वाढवा; माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख यांची मागणी; वनमंत्र्यांकडून टास्क फोर्सची घोषणा

**मुंबई/लातूर/प्रतिनिधी** : पर्यावरणाचा समतोल राखायचा असेल तर एकूण भूभागाच्या तुलनेत किमान ३३ टक्के वनक्षेत्र असणेआवश्यक आहे. मराठवाड्यात मात्र ३ टक्क्यांपेक्षा कमी वनक्षेत्र आहे. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती आणि कमी पर्जन्यमान पाहता या भागात वनीकरणाची नितांत गरज आहे. पडीक जमिनींचा वापर करून वनीकरण वाढवण्यासाठी शासन प्रयत्न करणार का आणि त्यासाठी टास्क फोर्स स्थापन करणार का, असा प्रश्न राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत उपस्थित केला.

माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांचे प्रश्न

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनातील प्रश्नोत्तराच्या तासात




महाराष्ट्र विधानसभा सभागृहात ९ जूलै रोजी बोलताना माजी मंत्री, आमदार देशमुख म्हणाले की, मराठवाड्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी पडीक आहेत, तसेच वन विभागाच्याही अनेक जमिनी ओसाड पडून आहेत. या जमिनी भाडेतत्त्वावर घेऊन किंवा इतर पर्यायांचा विचार करून त्याठिकाणी वनीकरण वाढवण्यासाठी वन विभाग प्रयत्न करणार आहे का? तसेच, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सरकार एखादा टास्क फोर्स तयार करणार आहे का?

वनमंत्र्यांकडून टास्क फोर्सची घोषणा

यावर उत्तर देताना वनमंत्री श्री. गणेश नाईक यांनी सांगितले की, मराठवाड्यासह राज्यातील शासकीय पडीक जमिनींचा उपयोग करून घेण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मराठवाड्यात वनीकरण वाढवण्यासाठी आणि वृक्षलागवडीची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी निश्चितपणे टास्क फोर्स तयार केला जाईल. यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींचाही सदस्य म्हणून समावेश केला जाईल.

वनमंत्र्यांनी यावेळी महत्त्वपूर्ण उपाययोजना स्पष्ट केली. बांबू लागवडीवर भर दिला जाणार असून बांबूपासून इथेनॉल निर्मिती करता येते, त्यामुळे मराठवाडा, विदर्भ आणि कोकण यांसारख्या भागांतील पडीक जमिनींवर बांबूची लागवड करून वनीकरण वाढवले जाईल असे सांगीतले.

वनमंत्री म्हणाले की, या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्याततील पडीक वनजमिनी निवडल्या जातील. या जमिनींना संरक्षक भिंत (कंपाऊंड) उभारून तेथे वृक्ष लागवड केली जाईल, या उपक्रमामुळे पशू-पक्ष्यांचा अधिवास वाढण्याच्या दृष्टीने व्यापक प्रयत्न केले जातील. तसेच तेथे नंतर बांबू लागवड केली जाईल. यामुळे पूरक उत्पन्न मिळेल, पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल. वन विभाग आणि सरकार या दिशेने तातडीने कार्यवाही करेल असे सांगीतले. माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे मराठवाड्यातील ओसाड जमिनींना नवी दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### अमरावती ‘एमआयडीसी’साठी सकारात्मक निर्णय घेणार - उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत

**मुंबई/प्रतिनिधी** : अमरावती जिल्ह्यात औद्योगिक गुंतवणूक वाढविण्यासाठी शासन सकारात्मक असून, एमआयडीसी संदर्भातील प्रलंबित प्रश्नांवर लोकप्रतिनिधी व उद्योजकांसोबत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली. विधानपरिषदेत नियम ९७ अन्वये सदस्य संजय खोडके यांनी अमरावती येथील एमआयडीसी व औद्योगिक विकासासंदर्भात अल्पकालीन चर्चा उपस्थित केली.

या चर्चेत सदस्य डॉ. परिणय फुके यांनी सहभाग घेतला. उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांनी सांगितले की, अमरावती जिल्हा गुंतवणूक परिषदेत २ हजार ८८५ कोटी रुपयांचे नवीन गुंतवणूक करार झाले असून, सुमारे ३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक विभागात येण्याची शक्यता आहे.

# नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार संपन्न

**केज/प्रतिनिधी**: उपविभाग केज अंतर्गत केज तालुक्यातील विविध ठिकाणी नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचा केज येथे महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यामध्ये चिंचोली माळी उपकेंद्र येथे नवीन पदस्थापना करण्यात आलेले सचिन शिवाजीराव गायकवाड यांची ऑपरेटर आणि एस. आर. आरेकर प्रधान तंतज्ञ् म्हणून नवीन नियुक्ती झालेली आहे यांच्यासह केज उपविभागीय कार्यालया अंतर्गत नव्याने रुजू झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. तेलंग दादा, पत्रकार तात्या गवळी, नागेश राऊत, राजाभाऊ राठोड, राम सोळुंके, गणेश गवळी, खाजू शेख, अशोकराव वैरागे,आणि इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांनी जीवनात नीती मूल्य, संस्कारास प्राधान्य द्यावे : जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड

**लातूर/प्रतिनिधी :** जीवनात सर्वांगीण प्रगतीच्या उद्दिष्ट्यपूर्तीसाठी विद्यार्थ्यांनी नीती मूल्ये, संस्कारास प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

लातूर येथील अभिनव मानव विकास संस्था द्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयात आयोजित दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भारत बास्टेवाड बोलत होते. याप्रसंगी संस्था अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, कोषाध्यक्ष जयेश बजाज, सहसचिव सुभाष कासले, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.






यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी अनेक क्षेत्र खुली असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय क्षेत्राकडे वळण्याऐवजी क्रीडा, कलेच्या क्षेत्राकडे वळण्याचा विचार करावा. यशासाठी कठोर परिश्रम, सातत्याची नितांत आवश्यकता असते. त्यामुळे प्रसंगी अपयशाने खचून न जाता सकारात्मक विचार करून प्रगतीपथाकडे वाटचाल करावी असे सांगून डॉ. बास्टेवाड यांनी विद्यार्थ्यांना आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगा, ज्या शाळेत शिकलो तेथून नेमके काय घेतले याचा नेहमीच विचार करत रहा असेही मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा यांनी यावेळी बोलताना संस्थेच्या प्रगतीचा आलेख संक्षिप्त स्वरूपात मांडला. विद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच बौद्धिक विकासावरही भर दिला गेल्याने सक्षम, निपुण विद्यार्थी तयार होत आहेत. पाठ्यपुस्तकातील ज्ञानाबरोबरच विद्यार्थी बहुश्रुत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी आपल्या मनोगतात यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन महाविद्यालयीन शिक्षणाचा ताण घेऊ नका. ताण घालविण्यासाठी छंद जोपासा असा मौलिक सल्ला दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागची पार्श्वभूमी विशद केली. शालेय जीवनात केवळ गुण संपादन करणे महत्वाचे नाही, तर खेळ, वाचन,चित्र, संगीताचाही अनुभव घेतला पाहिजे यासाठीही विद्यालय सतत प्रयत्नशील असते,असेही ते म्हणाले.

यावेळी दहावी परीक्षेतील गुणवंत, शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी शंभर विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच सायन्स ऑलिंपियाड तर्फे दिल्या गेलेल्या उत्तम प्राचार्य पुरस्काराबद्दल मुख्याध्यापक रमाकांत स्वामी तसेच आंतरराष्ट्रीय कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये यशस्वी सहभाग घेतलेले संस्थेचे सदस्य संजीव भार्गव यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनुजा देशपांडे यांनी तर संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल यांनी आभार प्रदर्शन केले .

## ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या ठेवीदारांचे पैसे त्वरित परत द्यावे – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी :** बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को.ऑपरेटिव्ह सोसायटीमधील ठेवीदारांना त्यांचे कष्टाचे पैसे तातडीने परत मिळवून देण्याच्या कार्यवाहीला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

यासंदर्भात विधान भवन येथे आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.बैठकीला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, गृहराज्यमंत्री योगेश कदम,बीडचे खासदार बजरंग सोनवणे,आमदार सर्वश्री प्रकाश सोळंके,प्रवीण दरेकर,सुरेश धस,रोहित पवार, आमदार संदीप क्षीरसागर,महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष अनास्कर,अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर,गृह व अंमलबजावणी संचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की,ठेवीदारांचे हित जपण्यासाठी महाराष्ट्र गुंतवणूकदार हितसंरक्षण (एमपीआयडी) कायद्यात आवश्यक सुधारणा करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करावा.हा कायदा अधिक सक्षम करून त्याअंतर्गत वित्तीय संस्था किंवा बँकांच्या मालमत्ता जप्त करणे आणि त्यांचा लिलाव करणे, ही प्रक्रिया जलद करावी.सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार क्लिष्ट आणि दीर्घकालीन प्रक्रियेला यंत्रणांना सामोरे जावे लागते.या प्रक्रियेत बदल करून,केंद्र शासनाच्या अंमलबजावणी संचालनालयाच्या धर्तीवर अशा प्रकरणातील जप्तीच्या कार्यवाहीसाठी राज्यातही व्यवस्था तयार करावी.यामुळे मालमत्ता जप्ती आणि लिलावाची कारवाई जलद गतीने करणे शक्य होईल.

बँकेच्या किंवा संस्थेच्या सर्व मालमत्तांचे अचूक मूल्यांकन करून, ज्या मालमत्तांचे मूल्यांकन सर्वाधिक आहे, त्यांचा प्राधान्याने विक्री केली जावी. मूल्यांकनानुसारच मालमत्तांची विक्री करून पारदर्शक पद्धतीने हा निधी थेट गुंतवणूकदारांना दिला जावा.या संपूर्ण प्रकरणाचा तिढा तातडीने सुटण्यासाठी गृह विभागाने अंमलबजावणी संचालनालयासोबत (ईडी) एकत्र बैठक घ्यावी आणि या कायदेशीर व तांत्रिक बाबींवर तातडीने कोणती पावले उचलता येतील,याबाबतची ठोस कार्यपद्धती निश्चित करावी,असेही आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

बीड जिल्ह्यातील आणि इतर भागांतील पीडित ठेवीदारांची बाजू मांडत या प्रक्रियेत गती आणण्याची विनंती लोकप्रतिनिधींनी यावेळी केली.दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बीड जिल्हाधिकारी,सरकारी वकील यांनी बैठकीत सहभाग घेतला.

## पनवेलच्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय–मंत्री उदय सामंत, शिलार धरण प्रकल्पासह विविध विकासकामांना गती

**मुंबई/प्रतिनिधी :** पनवेल शहरातील वाढत्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासन सकारात्मक असून, शिलार धरण प्रकल्पासह विविध पाणीपुरवठा योजनांना गती देण्यात येत असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य विक्रांत पाटील यांनी म.वि.प. नियम ९७ अन्वये या विषयी विधान परिषदेत अल्पकालीन चर्चा उपस्थितीत केली होती.

मंत्री उदय सामंत म्हणाले, पनवेल महापालिकेला दररोज २६८ दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता असून सध्या २०४ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे ६४ दशलक्ष लिटर पाण्याची कमतरता निर्माण झाली आहे. ही तूट भरून काढण्यासाठी ४९३ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून, या योजनेतून ९० दशलक्ष लिटर पाणी उपलब्ध होणार आहे. सध्या या योजनेतून ५७ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत असून उर्वरित काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठ्यात वाढ होणार आहे.

शिलार धरण प्रकल्पाद्वारे पनवेल महापालिकेच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले असून, भविष्यातील पाण्याची वाढती गरज लक्षात घेऊन शासन आवश्यक उपाययोजना करणार असल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील पार्किंग समस्येवरही शासन लक्ष केंद्रित करत असून, मल्टी–लेव्हल पार्किंगची उभारणी करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे. एकूण ४५४ आरक्षित भूखंडांपैकी ३४२ भूखंड महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत. पनवेलमधील सांस्कृतिक सुविधांच्या विकासालाही गती देण्यात येत आहे. सेक्टर–१० मधील सामाजिक सभागृहाचे काम सुरू असून सेक्टर–१३ मधील सामाजिक सभागृहाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच जुन्या पनवेलमध्ये नाट्यगृहासाठी इमारतीचा प्रस्ताव असून २७२ आसनक्षमतेचे मिनी ऑडिटोरियम आणि ५०० आसनक्षमतेचे बहुउद्देशीय सभागृह उभारण्यात येत आहे. या माध्यमातून पनवेलच्या सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

## मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालयातील लिफ्ट वारंवार बंद


### – वृद्ध, दिव्यांग आणि नागरिकांची प्रचंड गैरसोय – सम्राट मित्र मंडळाचे निवेदन; प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप

**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर येथील मध्यवर्ती इमारतीतील विविध शासकीय कार्यलयांत जाण्यासाठीची लिफ्ट वारंवार बंद राहत असल्याने सर्वसामान्य नागरिक, वृद्ध, महिला, दिव्यांग आणि आजारी व्यक्तींना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

विशेषतः उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालय हे तिसऱ्या मजल्यावर असल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून पायऱ्या चढाव्या लागत आहेत.

महसूल न्यायालयाच्या तारखांच्या दिवशी तर परिस्थिती अधिकच गंभीर बनली.अनेक वृद्ध नागरिकांना एक–एक पायरी चढत तिसऱ्या मजल्यावर जावे लागले. काही जण थकव्यामुळे मार्गातच बसून विश्रांती घेत असल्याचे अत्यंत वेदनादायी चित्र पाहायला मिळाले. या घटनेमुळे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला आहे.

या गंभीर समस्येबाबत सम्राट मित्र मंडळाने यापूर्वीच उपजिल्हाधिकारी महोदया यांना लिफ्ट कायमस्वरूपी कार्यरत ठेवण्याबाबत लेखी निवेदन दिले होते. मात्र, त्या निवेदनाची कोणतीही दखल घेण्यात आली नाही.थातूरमातूर कार्यवाही केल्यासारखे करून परिस्थीती जैसे थे राहीली. परिणामी नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी





तीव्र नाराजी आणि संतापाची भावना निर्माण झाली आहे.

सम्राट मित्र मंडळाने प्रशासनाला इशारा दिला आहे की, लिफ्ट तात्काळ सुरू करून ती कायमस्वरूपी कार्यरत ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी. अन्यथा सर्वसामान्य नागरिकांना सोबत घेऊन तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल. या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

लोकाभिमुख प्रशासनाचा दावा करणाऱ्या शासनाने नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यात अपयश येणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी आणि लिफ्ट नियमित सुरू ठेवावी, अशी लेखी मागमी सम्राट मित्र मंडळाने उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडे केली आहे.

## ‘स्टेप’ उपक्रमातील शॉर्ट टर्म कोर्सेससाठी नियमित आयटीआय अभ्यासक्रमाचा निधी वापरलेला नाही – कैशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा

**मुंबई/प्रतिनिधी :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील ’स्टेप’ उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या शॉर्ट टर्म व डव्हान्स कोर्सेससाठी नियमित आयटीआय अभ्यासक्रमाचा निधी वापरण्यात आलेला नसून, त्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यामुळे नियमित अभ्यासक्रमावर कोणताही परिणाम झालेला नाही, असे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य संजय खोडके यांनी ’स्टेप’ उपक्रमातील कथित अनियमिततेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री लोढा बोलत होते.

मंत्री लोढा म्हणाले की, बदलत्या काळानुसार अल्पकालीन व प्रगत कौशल्य प्रशिक्षणाची गरज लक्षात घेऊन आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सॉलिड, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रिकल फिटिंग आदी विषयांतील शॉर्ट टर्म आणि डव्हान्स कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत. हे कोर्सेस स्वतंत्र निधीतून राबविण्यात आले असून, नियमित आयटीआय अभ्यासक्रमाच्या निधीतून एकही रुपया खर्च करण्यात आलेला नाही.

राज्यात गेल्या तीन वर्षांत आयटीआयमध्ये विविध नाविन्यपूर्ण प्रयोग यशस्वीपणे राबविण्यात आले असून, त्याचा सकारात्मक परिणाम प्रवेश प्रक्रियेवर झाला आहे. यंदा आयटीआयमधील प्रवेशाचे प्रमाण सुमारे ९८ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा असल्याचेही त्यांनी सांगितले.

आयटीआयमधील विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नसल्यामुळे खोट्या नोंदी करून आर्थिक गैरव्यवहार करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, अशी माहिती मंत्री लोढा यांनी दिली.

## राज्यात १ जूनपासून सरासरी ३३२ मिमी पावसाची नोंद

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात मान्सून सक्रिय असून १ जूनपासून आतापर्यंत राज्यात सरासरी ३३२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाने बुधवारी याबाबत माहिती दिली. सकाळी ११ वाजेपर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, मागील २४ तासांत रायगड जिल्ह्यात सर्वाधिक ७१.४ मिमी पाऊस झाला. तसेच कोकण , उत्तर महाराष्ट्र , पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ विभागातील अनेक जिल्ह्यांमध्येही पावसाची नोंद झाली आहे. रायगडनंतर ठाणे, सातारा आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी ३७.२ मिमी, तर मुंबई उपनगर जिल्ह्यात ३२.४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. राज्याच्या विविध भागांमध्ये झालेल्या या पावसामुळे मान्सून सक्रिय असल्याचे स्पष्ट होत आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## समिती सदस्य व अधिकारी यांच्या गैरकृत्यामुळे वृद्ध कलावंतांवर अन्याय का?

### संबंधितांवर कारवाई करून कलावंतांना न्याय द्यावा, बहुजन हक्क कलावंत समितीची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** २०२१ ते २०२४ या कालावधीत तयार करण्यात आलेली यादी रद्द करण्याचा ठराव लातूर जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. या ठरावामुळे या यादीत समाविष्ट असलेल्या खऱ्या कलावंतांवर अन्याय होणार असून बोगस कलावंतांची निवड करणाऱ्या समितीतील सदस्य व अधिकाऱ्याच्या गैरकृत्याचा भुर्दंड खऱ्या कलावंतांना बसणार आहे. तेंव्हा या यादीतील बोगस कलावंतांचा शोध घेवून केवळ त्यांचीच नावे रद्द करावीत व गेल्या तीन वर्षापासून प्रलंबीत असलेल्या ज्येष्ठ कलावंतांचे मानधन द्यावे व त्यांच्या मरणयातना थांबवाव्यात, अशी मागणी बहुजन हक्क कलावंत समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

लातूर जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत जि. प. सदस्य तानाजी बिरादार यांनी २०२१ ते २०२४ या कालावधीत तयार करण्यात आलेल्या वृद्ध कलावंताच्या यादीबाबत एक प्रश्न उपस्थित केला असता रामचंद्र तिरूके यांनी ही यादीच रद्द करावी अशी मागणी केली. या यादीबाबत समितीचे अध्यक्ष असलेले जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून पुढील निर्णय घेणार असल्याचे जि. प. उपाध्यक्ष दयानंद सुरवसे यांनी सांगितले. ही यादी रद्द झाल्यास यातील जे खरे कलावंत आहेत त्यांच्यावर अन्याय होणार आहे. या यादीतील बरेचसे कलावंत हे खरे कलावंत आहेत व त्यांनी जिल्हा परिषद सभागृहात यापूर्वी ऑडीशन दिली आहे. मात्र, ज्येष्ठ कलावंत निवड समितीचे सदस्य, सचिव यांनी जाणीवपूर्वक काही जणांची ऑडीशन न घेताच त्या सर्व बोगस कलाकारांचा या यादीत समावेश केल्याने बोगस कलावंतांचीही नावेही यादीत आहेत. ऑडीशन घेवूनच कलाकारांची निवड केली जाते. या कलाकरांची निवड ही समितीचे अध्यक्ष, सचिव व सदस्य यांच्या संमतीशिवाय किंवा त्यांच्या मंजुरीशिवाय होऊच शकत तेंव्हा त्यांच्या या गैरकृत्याचा भुर्दंड ज्यांनी यापूर्वी ऑडीशन दिलेली आहे व जे खरे कलावंत आहेत त्यांना का? असा सवाल ज्येष्ठ कलावंतांच्या संघटनांच्या वतीने उपस्थित केला जात आहे. या सर्व प्रकाराची चौकशी करून या यादीत बोगस कलावंत घुसवणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी व यादीतील बोगस कलावंत हटवून त्यांना व संबंधीत अधिकाऱ्यांना योग्य ते शासन करावे, अशी मागणी बहुजन हक्क कलावंत समिती, महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष शाहीर सुभाष साबळे यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, सांस्कृतीक मंत्री, पालकमंत्री यांच्याकडे केली आहे.

लातूर जिल्ह्यातील सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षात पात्र ठरविण्यात आलेल्या लोकांच्या खात्यावर मानधन मिळणेकरीता शासनाच्या नियमानुसार आधार पडताळणी करणेसाठी पंचायत विभाग, जि. प. लातूर व संचालक कार्यालय, मुंबई यांना वारंवार विनंती केली. परंतु लातूरच्या पंचायत विभागाने संपूर्ण जिल्ह्यातील कलावंताची दिशाभूल आजपर्यंत केली व यापुढे चालूच आहे. सदर दिशाभुली बाबत विचारणा केली असता समितीचे सचिव उडवाउडवीची उत्तरे देतात, त्यांची तक्रार अध्यक्षांना केली तर अध्यक्ष म्हणतात की, माझ्याकडे फक्त स्वाक्षरीचे काम आहे हे काम सचिव पाहतात. यांची तक्रार संचालक यांच्याकडे केली तर ते म्हणतात की, तुम्ही कोर्टात जा पुन्हा बघू, आमच्याकडे याचे काही नाही अशी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. तेंव्हा वरील प्रकरणी लातूर जिल्ह्यातील वृध्द कलावंत समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी, सचिव जि. प. पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व महाराष्ट्राचे संचालक यांची चौकशी करून त्यांना योग्य ती समज द्यावी व सन २०२१ पासून प्रलंबित मानधन वृध्द कलावंतांच्या खात्यावर वर्ग करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणीही बहुजन हक्क कलावंत समिती, महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.